## नियमीत दिवाणी दावा क्र. ३०८/२०२५ मध्ये निशाणी ५ खालील आदेश

वादिने सदरचा दावा हा प्रतिवादीविरुद्ध दावामिळकतीची जैसेथे परिस्थीती ठेवण्यासाठी दाखल केला आहे. दिनांक १५.१२.२०२५ रोजी निशाणी ५ वरील आदेशाअन्वये न्यायालयाने प्रतिवादींना नोटीस काढण्याचे आदेश पारीत केले होते. आजरोजी दिनांक १६.१२.२०२५ रोजी वादीने पटलावर प्रतिवादी क्र. १ यांनी दावामिळकत दिनांक १४.१२.२०२५ रोजी हस्तांतरीत केल्याचा दस्त दाखल केला आहे. वादीच्या कथनाप्रमाणे दावामिळकत ही वडीलोपार्जीत आहे. वादी क्र. १ यांची आई चंद्रभागा मयत पावल्यानंतर तिच्या नावे असलेल्या मिळकतीवर तिच्या वारसांचा समान अधिकार आहे. त्यामुळे दावामिळकतीची जैसेथे परिस्थीती ठेवण्याची विनंती केली. वादी यांच्या विद्वान वकिलांचा युक्तीवाद ऐकला. वादपत्र, अर्ज व त्यासोबतच्या दस्तांचे अवलोकन केले. वादीने दाखल केलेल्या दस्तांवरुन प्रथमदर्शनी दावामिळकत ही चंद्रभागा यांची होती हे स्पष्ट होते. चंद्रभागा यांनी प्रतिवादी क्र. १ म्हणजे वादी क्र. १ यांचे वडील यांच्या लाभामध्ये मृत्युपत्र किंवा दावामिळकत गट क्र. १२७ मधील ३ एकर २५ गुंठे क्षेत्राबाबत दस्त करुन दिल्याबाबतचा कोणताही पुरावा पटलावर दाखल केला नाही. त्यामुळे आजरोजी प्रतिवादी हे दाव्यामध्ये हजर होउन त्यांचे म्हणणे दाखल करेपर्यंत दावामिळकतीची जैसेथे परीस्थीती ठेवणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रतिवादींविरुद्ध एकतर्फा मनाई हुकुम पारीत करणे गरजेचे आहे. म्हणुन मी खालील आदेश पारीत करीत आहे.

### –: आदेश :–

०१. वादी व प्रतिवादींनी दावामिळकत पुढील तारखेपर्यंत जैसे थे ठेवावी असा आदेश पारीत करण्यात येतो.

०२. सदर आदेशाची माहिती वादीने प्रतीवादींना दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ३९ नियम ३ अन्वये दयाची व त्याबाबतचे शपथपत्र न्यायालयात दाखल करावे.

०३. वादीने वादपत्र, त्यासोबतचे दस्त, निशाणी ११ वरील अर्ज व त्यावरील आदेशाची प्रत व इतर दसत प्रतिवादींना दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ३९ नियम ३ अन्वये दयावेत.

Digitally signed by DNYANESHWAR MADHUKAR GITTE
Date: 2025.12.16 11:32:33 +0530

ठिकाण :– रेणापुर (ज्ञा.म.गित्ते)

दिनांक :– १६/१२/२०२५ सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,

रेणापुर